सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २१८ • गुरुवार दि.२८ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदी डी.के.शिवकुमार

बंगळुरु:कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी गुरुवारी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा जाहीर केला. मंत्र्यांसोबत झालेल्या ब्रेकफास्ट बैठकीतच त्यांनी हा निर्णय सांगत उपमुख्यमंत्री डी.के.शिवकुमार यांच्या नावाचा मुख्यमंत्रीपदासाठी प्रस्ताव मांडला. यानंतर शिवकुमार यांनी सिद्धरामय्यांच्या पाया पडून आशीर्वाद घेतल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. काँग्रेस नेतृत्वाने अडीच-अडीच वर्षांच्या फॉर्म्युल्यानुसार नेतृत्वबदलाचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. २०२३ मध्ये काँग्रेस सत्तेत आल्यानंतर सिद्धरामय्या मुख्यमंत्री झाले होते, तर आता डी.के.शिवकुमार मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळणार आहेत.सिद्धरामय्या यांनी राज्यपालांकडे आपला राजीनामा सुपूर्द केला असून लवकरच डी.के.शिवकुमार मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे.

## नीट परीक्षा लष्कराच्या नियंत्रणात?

### केंद्र सरकारकडून मोठ्या हालचाली

नवी दिल्ली: नीट २०२६ च्या पेपरफुटी प्रकरणाची केंद्र सरकारकडून गंभीर दखल घेतली जात आहे. रद्द झालेली आगामी नीट परीक्षा व सुरक्षेची जबाबदारी भारतीय लष्कराकडे सोपविण्याबाबत केंद्र सरकार गांभिर्याने विचार करीत आहे. या संदर्भात आज केंद्रीय संरक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक घेण्यात येत आहे. या बैठकीनंतर पुढील निर्णय जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणानंतर केंद्र सरकार आता कठोर पावले उचलण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. भविष्यात कोणत्याही प्रकारचा दगाफटका होऊ नये आणि परीक्षेची विश्वासार्हता अबाधित राहावी यासाठी आगामी परीक्षांच्या सुरक्षेची जबाबदारी थेट भारतीय लष्कराकडे सोपवण्याबाबत सरकार गंभीरपणे विचार करत असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. या संदर्भात दिल्लीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक सुरू असून, त्यामध्ये विविध मंत्रालयांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाल्याची माहिती मिळत आहे. प्रश्नपत्रिका छपाईपासून ते वितरणापर्यंत संपूर्ण प्रक्रिया अधिक गोपनीय आणि सुरक्षित करण्यासाठी लष्कराच्या मदतीचा पर्याय चर्चेत असल्याचे समजते. दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणाचा तपास करणाऱ्या केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) देशभरात धडक कारवाया सुरुच ठेवल्या आहेत. या प्रकरणात आणखी दोघांना अटक करण्यात आली असून, एकूण आरोपींची संख्या आता १३ वर पोहोचली आहे. विशेष म्हणजे ताज्या अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींचा संबंध महाराष्ट्राशी असल्यामुळे राज्यातही मोठी खळबळ उडाली आहे. सीबीआयने लातूर येथील बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना अटक केली आहे. त्यांच्यावर रसायनशास्त्र विषयाचे लीक झालेले प्रश्न विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्याचा गंभीर आरोप पान ४ वर

## खा.श्रीकांत शिंदे व आ.चिखलीकरांमध्ये बंद दाराआड चर्चा;राजकीय चर्चांना उधाण

नांदेड/प्रतिनिधी-शिवसेनेचे नेते व खा.डॉ. श्रीकांत शिंदे हे बुधवारी नांदेड दौऱ्यावर आले असतांना रात्री उशिरा राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी हॉटेलात त्यांची भेट घेवून बंद दाराआड चर्चा केली आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही नेत्यांच्या भेटीला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.



शिवसंवाद कार्यक्रमा-निमित्त खा.डॉ. श्रीकांत शिंदे हे बुधवारी नांदेड दौऱ्यावर आले आहेत. नांदेड उत्तर व नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा आढावा बैठकीला उपस्थित राहिले. शिवाजीनगर औद्योगीक वसाहतीमधील एका हॉटेलमध्ये त्यांचा मुक्काम होता. बुधवारी रात्री उशिरा आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी खा.डॉ.शिंदे यांची हॉटेलमध्ये भेट घेतली. या दोन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा झाली आहे. दोन्ही नेत्यांमध्ये भेटीचा तपशील समजू शकला नाही. परंतु आ. चिखलीकर यांनी खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांची भेट घेतल्याची माहिती प्रसारमाध्यमांना दिली. खा. शिंदे हे महायुतीतील शिवसेनेचे नेते आहेत. आम्ही दोघांनी गेल्या पान ४ वर




बकरी ईद निमित्त देगलूर नाका भागातील ईदगाह मैदानावर आज (गुरुवार) सकाळी सामुहिक नमाज अदा करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

## मुख्यमंत्री,दोन उपमुख्यमंत्री दिल्लीत तळ ठोकुन

मुंबई/प्रतिनिधी-राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार हे सलग दुसऱ्या दिवशी दिल्लीमध्ये विविध बैठका घेत असल्याने राज्यातील सत्ता-समीकरणांबाबत अनेक तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडींची चाहूल लागल्याची चर्चा सध्या जोर धरू लागली आहे. महायुतीतील तिन्ही प्रमुख नेत्यांच्या दिल्ली दौऱ्यामुळे वरवर पाहता विधान परिषद निवडणुकीसाठी जागावाटपाची चर्चा सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी, पडद्यामागे महाराष्ट्रातील मोठ्या राजकीय बदलांची रणनीती आखली जात असल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दिल्लीमध्ये काल दिवसभर मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी केंद्रीय मंत्र्यांसोबत मॅरेथॉन बैठका घेतल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री शिवराजसिंग चौहान तसेच भाजपाचे वरिष्ठ नेते सी.आर.पाटील यांच्यासोबत महाराष्ट्रातील विविध प्रश्नांवर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. कांदा, साखर उद्योग, सहकार क्षेत्र, प्रादेशिक विकास, निधी वाटप आणि आगामी निवडणुकांबाबत सविस्तर चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे.याचवेळी मुख्यमंत्री फडणवीस आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या भेटीनेही नव्या चर्चांना उधाण आले आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी विधान परिषदेसाठी इच्छुक असलेल्या तब्बल ४८ उमेदवारांची यादी केंद्रीय नेतृत्वाकडे सादर केल्याचे समोर आले आहे.महायुतीमध्ये विधान परिषद जागावाटपासाठी ११-४-२ हा फॉर्म्युला जवळपास अंतिम टप्प्यात पोहोचल्याची चर्चा आहे. नाशिक आणि संभाजीनगरच्या जागांवर भाजपचा अजूनही ठाम आग्रह कायम असल्याचे बोलले जात आहे. तर रायगड आणि पुणे या जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे, तर परभणीची जागा शिंदे गटाकडे जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.मात्र, या बैठका केवळ विधान परिषद निवडणुकीपुरत्याच मर्यादित नसून राज्यातील आगामी राजकीय रणनीती, मंत्रिमंडळ विस्तार, संघटनात्मक फेरबदल आणि प्रादेशिक समतोल या विषयांवरही दिल्ली दरबारात चर्चा सुरू असल्याची कुजबूज आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि विधानसभा राजकारणाच्या पार्श्वभूमीवर महायुतीत मोठे बदल घडू शकतात, अशी शक्यता राजकीय निरीक्षकांकडून व्यक्त केली जात आहे.

## जीव गेला तर सरकार जबाबदार

### ३० मे पासूनच्या कडक उपोषणावर मनोज जरांगे ठाम



जालना:मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पुन्हा एकदा आंदोलनाची धार तीव्र करत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी ३० मेपासून कडक आमरण उपोषण करण्याची घोषणा केली आहे. राज्य सरकारला दिलेली मुदत संपल्यानंतर गुरुवारी त्यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल करत देशात कधीच झाले नसेल इतके कठोर उपोषण करणार, असा इशारा दिला.

मराठा आरक्षणासंदर्भातील अनेक प्रलंबित मागण्यांसाठी मनोज जरांगे यांनी यापूर्वीच आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. आज याबाबत आंतरवाली सराटी येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी सरकारविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. राज्य सरकारला आपण तब्बल दहा महिने वेळ दिला. प्रेमाने बैठका घेतल्या, मोर्चे काढले, पण आरक्षण मिळाले नाही. आता रखरखत्या उन्हात बाज टाकून मी आमरण उपोषणाला बसणार आहे. माझ्या जिवाची लाहीलाही झाली तरी चालेल.काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आ.प्रसाद लाड यांना जरांगेंकडे पाठवून आणखी मुदत मागितली होती. त्यानंतर जरांगेंनी सात दिवसांची मुदत दिली होती. ही मुदत गुरुवारी संपल्यानंतर त्यांनी पुन्हा कठोर भूमिका जाहीर केली. सरकारला जर आमच्याबद्दल माया असती तर आतापर्यंत आरक्षण दिले असते. अजून किती दिवस वाट पाहायची? आमच्या लोकांच्या आयुष्याचा इथे उन्हाळा झाला आहे, असे सांगत त्यांनी समाजबांधवांना आंतरवाली येथे न येण्याचे आवाहनही केले. मी एकटाच उपोषणाला बसणार आहे. त्यात मेलो तर मेलो. उष्माघाताने माझा जीव गेला तर त्याला सरकार जबाबदार असेल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. सरकारवर गंभीर आरोप करताना जरांगे म्हणाले, इतके क्रूर सरकार यापूर्वी कधी आले नसेल. तुम्हीच आमच्यावर हल्ले करायचे आणि तुम्हीच गुन्हे दाखल करायचे, ही दुटप्पी भूमिका कशासाठी? मराठवाड्यात पाणी नाही, आरक्षण नाही. आम्ही काय चूक केली? ५८ लाख कुणबी प्रमाणपत्रे कधी देणार? असा थेट सवाल त्यांनी सरकारला केला. ३० तारखेपासूनचा संघर्ष निर्णायक होईल, असा निर्वाणीचा इशाराही त्यांनी दिला.

## पेट्रोल-डिझेलवरील कर कमी करुन सामान्यांना दिलासा द्या

### भारतीय कम्युनिस्ट पक्षाची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचे आर्थिक बजेट कोलमडत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पेट्रोल-डिझेलवरील एक्साईज ड्युटीत कपात करावी, राज्य सरकारने आपल्या करांमध्ये सवलत द्यावी तसेच नांदेड-वाघाळा महानगरपालिकेने इंधनावर लावलेला सेस कमी करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नांदेड जिल्हा शाखेने केली आहे.

पक्षाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पेट्रोल-डिझेल दरवाढीचा थेट परिणाम वाहतूक खर्चावर होत असून त्याचा परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतींवरही दिसून येत आहे. त्यामुळे महागाई वाढत असून सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित बिघडत आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, केंद्र सरकारने एक्साईज ड्युटीत कपात तर राज्य सरकारनेही करांमध्ये कपात करून नागरिकांना दिलासा द्यावा. त्याचबरोबर नांदेड-वाघाळा महानगर पालिकेने इंधनावरील सेसचा फेरविचार करून त्यात कपात करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.भारतीय कम्युनिस्ट पक्षाने महागाईच्या पार्श्वभूमीवर सर्व स्तरांवरील सरकारांनी जनतेच्या हिताचा विचार करून पान ४ वर

## नसरापूर प्रकरणातील आरोपीविरुद्ध अवघ्या २८ दिवसांत आरोपपत्र दाखल

पुणे:नसरापूर येथील अल्पवयीन बालिकेवरील लैंगिक अत्याचार आणि खून प्रकरणात आरोपी भीमराव कांबळे याच्याविरोधात विशेष न्यायालयाने गंभीर आरोप निश्चित केले आहेत. अवघ्या २८ दिवसांत पोलिसांनी तपास, पुरावे संकलन आणि चार्जशीट दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण करत न्यायालयीन कामकाजाला वेग दिला आहे.

नसरापूर येथे एका अल्पवयीन बालिकेवर लैंगिक अत्याचार व खून प्रकरणावरुन राज्यात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी आज गुरुवारी विशेष न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. फास्ट ट्रॅक कोर्टात प्रथमच आरोपी भीमराव कांबळे याला हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयात पीएम रिपोर्ट, विविध वैद्यकीय चाचण्यांचे अहवाल तसेच अन्य महत्त्वाचे पुरावे सादर करण्यात आले. दोन्ही बाजूंकडून जोरदार युक्तिवाद करण्यात आला. मात्र आरोपीच्या बाजूने कोणताही ठोस पुरावा सादर करण्यात न आल्याने न्यायालयाने आरोपी विरोधातील आरोप निश्चित केले.या सुनावणीवेळी विशेष सरकारी वकील ड. अजय मिसर, मूळ तक्रारदार पक्षाचे वकील, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल तसेच तपास अधिकारी न्यायालयात उपस्थित होते. आता या खटल्याची रोज सुनावणी होणार असून सुनावणी इन कॅमेरा पद्धतीने पार पडणार असल्याचे सांगण्यात आले.या प्रकरणात पोलिसांनी अवघ्या १५ दिवसांत चार्जशीट दाखल केली होती. त्यानंतर चार्जशीटवरील सुनावणी पूर्ण झाली असून न्यायालयाने पुढील प्रक्रिया वेगाने सुरू ठेवण्याचे संकेत दिले आहेत.

## किनवट येथे जनविरोधी धोरणांविरोधात आंदोलन

### किसान सभा,डीवायएफआय,सिटूचा सहभाग

किनवट/प्रतिनिधी-केंद्र सरकारच्या जनविरोधी व कॉर्पोरेटधार्जिण्या धोरणां विरोधात अखिल भारतीय किसान सभा, डी.वाय.एफ. आय. आणि सिटू संघटनांच्या वतीने २८ मे रोजी किनवट येथील जिजामाता चौकात तीव्र निदर्शने करण्यात आली.

नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी, पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅस सिलिंडरच्या सतत वाढणाऱ्या दरांवर नियंत्रण आणावे, वाढत्या महागाईला आळा घालावा, शेतकऱ्यांचा खडलेला




पीकविमा तात्काळ मंजूर करावा तसेच खत व बी-बियाण्यांच्या दरवाढीचा निर्णय मागे घ्यावा, अशा विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. तसेच केरळचे मुख्यमंत्री पीनराय विजयन यांच्या निवासस्थानी ईडीने टाकलेल्या धाडीचा निषेधही यावेळी करण्यात आला.आंदोलनाला संबोधित करताना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (माकप) नेते कॉ.अर्जुन आडे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. सध्याचे सरकार हे अदानी-अंबानी-सारख्या भांडवलदारांच्या हिताचे निर्णय घेत असून सर्वसामान्य जनता, शेतकरी, कामगार आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत आहे. पेट्रोल-डिझेल कंपन्यांना मोकळीक देऊन जनतेची आर्थिक लूट सुरू आहे. या जनविरोधी धोरणांविरोधात आता जनतेने संघटित होऊन संघर्ष उभारण्याची गरज आहे असे ते म्हणाले. या आंदोलनात जनार्दन काळे, इंदल राठोड, प्रशांत जाधव, शेषराव ढोले, सीताराम आडे, पान ४ वर


# मतदार यादीची शुद्धता आणि लोकशाहीचा पाया

**बिहारमध्ये राबविण्यात येणाऱ्या विशेष मतदार यादी पुनर्परीक्षण मोहिमेला (एसआयआर) सर्वोच्च न्यायालयाने दिलेली घटनात्मक मान्यता ही भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घटना ठरली आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने निवडणूक आयोगाला मतदार यादीचे पुनर्परीक्षण करण्याचा अधिकार केवळ वैधच नाही, तर मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. या निर्णयामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदार यादीची अचूकता आणि लोकशाही संस्थांवरील विश्वास यांना बळ मिळाले आहे. व्यक्त केलेला अविश्वास देखील महत्त्वपूर्ण आहे. भारतीय लोकशाहीची संपूर्ण इमारत मतदार यादीच्या विश्वासार्हतेवर उभी आहे. मतदार यादीत मृत व्यक्तींची नावे, स्थलांतरित नागरिकांची नोंद किंवा अपात्र व्यक्तींचा समावेश राहिला तर निवडणुकीच्या शुद्धतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. त्यामुळे वेळोवेळी मतदार यादीचे पुनर्परीक्षण करणे ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून लोकशाहीच्या संरक्षणाची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयानेही याच भूमिकेला मान्यता देताना लोकशाही म्हणजे पात्र मतदारांचा सहभाग असे स्पष्ट निरीक्षण नोंदविले आहे. मात्र या निर्णयाकडे केवळ कायदेशीर दृष्टीकोनातून पाहणे पुरेसे ठरणार नाही. मतदार पुनर्परीक्षणाच्या प्रक्रियेत सामान्य नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण तितकेच महत्त्वाचे आहे. अनेक वेळा कागदपत्रांच्या त्रुटी, प्रशासनातील हलगर्जीपणा किंवा डिजिटल नोंदीतील चुका यामुळे पात्र मतदारांची नावे यादीतून वगळली जातात. अशा घटना लोकशाहीसाठी तितक्याच धोकादायक आहेत. म्हणूनच पुनर्परीक्षण करताना पारदर्शकता, लोकसहभाग आणि अपीलची प्रभावी व्यवस्था आवश्यक ठरते. बिहारमधील एसआयआर मोहिमेवर विरोधकांनी राजकीय हेतूंचा आरोप केला होता. काही याचिकांमध्ये या प्रक्रियेचा वापर विशिष्ट समाजघटकांना लक्ष्य करण्यासाठी होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने आयोगाच्या अधिकारांना मान्यता दिली असली तरी नागरिकत्व ठरविण्याचा अंतिम अधिकार निवडणूक आयोगाकडे नसल्याचे स्पष्ट करून महत्त्वाची मर्यादाही अधोरेखित केली आहे. ही बाब लोकशाही संतुलनासाठी महत्त्वाची आहे. कारण मतदार यादीची शुद्धता राखण्याच्या नावाखाली नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा येता कामा नये. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील अलीकडच्या निवडणुकांकडेही पाहण्याची गरज आहे. लोकसभा निवडणुकीनंतर अल्पावधीत झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये मतदारसंख्येतील वाढ, नव्या नोंदी आणि कथित अनियमितता यावर मोठ्या प्रमाणात चर्चा झाली होती. विरोधकांनी मतदार यादीतील विसंगतींचा मुद्दा उपस्थित केला, तर सत्ताधाऱ्यांनी आयोगाच्या प्रक्रियेवर विश्वास व्यक्त केला. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय एक व्यापक संदेश देतो लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून मतदार यादीच्या विश्वासार्हतेवर तिचे भवितव्य अवलंबून आहे.आजच्या डिजिटल युगात मतदार यादी अद्ययावत ठेवणे पूर्वीपेक्षा अधिक सोपे झाले असले, तरी त्याचबरोबर चुकीची माहिती, बनावट कागदपत्रे आणि राजकीय दबाव यांची आव्हानेही वाढली आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना मानवी संवेदनशीलता आणि कायदेशीर काटेकोरपणा यांचा समतोल राखणे गरजेचे आहे. पुनर्परीक्षण प्रक्रिया नागरिकांना त्रासदायक न ठरता विश्वास निर्माण करणारी असली पाहिजे. लोकशाहीतील निवडणूक आयोग ही एक स्वतंत्र आणि विश्वासार्ह संस्था मानली जाते. त्या संस्थेवरील विश्वास टिकवणे ही आयोगाइतकीच राजकीय पक्षांची आणि समाजाचीही जबाबदारी आहे. प्रत्येक पुनर्परीक्षण मोहिमेकडे संशयाने पाहणे जितके अयोग्य, तितकेच प्रत्येक कारवाईला प्रश्नांच्या पलीकडे मानणेही धोकादायक आहे. म्हणूनच न्यायालयाने दिलेला निर्णय हा आयोगाच्या अधिकारांना समर्थन देतानाच जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. शेवटी, मतदार यादीची शुद्धता ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून लोकशाहीच्या आत्म्याशी निगडित बाब आहे. पात्र नागरिकाचे मत सुरक्षित राहिले पाहिजे आणि अपात्र मत रोखले गेले पाहिजे. या दोन्ही गोष्टींचा समतोल राखण्यातच लोकशाहीचे खरे यश दडलेले आहे.**

# सरकारच्या चुकीच्या धोरणाला कॉकरोच डंक मारणार का?

आता कॉकरोचचे वादळ थांबायचे नाय!देश विकासाच्या प्रगतीचे पथावर आहे ही बाब सत्य आहे, तरीही देशात बेरोजगारी, कुपोषण, भुकमरी, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, बेरोजगारांच्या समस्या, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि इतर क्षेत्रातील भ्रष्टाचार या सारख्या गंभीर समस्या आजही देशात घर करून बसल्या आहेत. कारण वाढल्या भ्रष्टाचाराने देशाला पोखरून टाकले आहे. वाढती बेरोजगारी व महागाईचा कळस यात बेरोजगार तरूण भरडल्या जात आहे आणि आता बेरोजगारांची तुलना कॉकरोच सोबत करून बेरोजगारांच्या जखमेवर मीठ चोळन्याचे काम सरन्यायाधीशांनी केले. त्यामुळे याचे पडसाद संपूर्ण देशभर व देशाच्या बाहेर सुद्धा उमटतांना दिसत आहे. आज देशातील वाढत्या बेरोजगारीमुळे युवा वर्ग त्रस्त आहे आणि यात महागाईने मोठी भर टाकुन देशाच्या युवावर्गासोबतच देशाच्या १४० कोटी जनतेला व्दीधेमध्ये टाकले. सरकारने स्वतःच्या स्वार्थासाठी अनेक मोफत सुविधा अंमलात आणुन आम जनतेच्या खिशाला मोठी कात्री लावली आहे व देशाची अर्थव्यवस्था चौपट झाल्याचे दिसून येते.



देशात शेतकरी वर्ग, बेरोजगार युवक,आम जनता अत्यंत त्रस्त आहे. कारण सरकारने लावलेली मोफतच्या योजना याची संपूर्ण झळ महागाईच्या रूपात देशाच्या गरीब भोळ्याभाबड्या जनतेला भोगावी लागते आहे. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी एका सुनावणी दरम्यान देशातील बेरोजगार तरूणांना झुरळ (कॉकरोच) म्हटले. ते म्हणाले की, काही बेरोजगार तरूण झुरळांसारखे (कॉकरोच सारखे) असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंव्वा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थापनेवर हल्ला करू लागतात. या त्यांच्या वक्तव्याने देशातच नाही तर संपूर्ण जगभरात सोशल मीडियाच्या माध्यमातून खळबळ उडाली. शेवटी सरन्यायाधीशांनी म्हटले की, माझ्या वक्तव्याचा विपर्यास लावला. ही बाब आम्हीही समजु शकतो किंव्वा सत्य राहु शकते यात दुमत नाही. परंतु झुरळ (कॉकरोच) या शब्दने देशातील संपूर्ण बेरोजगार तरूणांनवर एवढा मोठा घाव केला की, तो भरून निघने शक्य नाही. कारण देशात आपण ताजे नीट पेपर लिक प्रकरण पहाले यात २५ हजार युवकांना त्याची झळ सोसावी लागत आहे व त्यांची मनःस्थिती विस्कळीत झाली आहे आणि चार ते पाच युवकांनी या प्रकरणाला कँटाळून आत्महत्या सुध्दा केल्याचे दिसून येते. म्हणजे तरूणांच्या डोळ्यासमोर शिक्षण प्रणालीची खुली हत्या होत आहे, त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात लुट आताही सुरूच आहे, देशात करोडोंचे प्रोजेक्ट आल्याचे मिडियाच्या माध्यमातून सरकार कडून सांगितले जाते परंतु बेरोजगारांना अजुनही रोजगार उपलब्ध झालेला नाही, आज देशातील प्रत्येक जिल्ह्यातील किंव्वा शहरातील युवकांना त्यांच्या स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध नसल्याने आपला परिवार सोडून मुंबई, बंगलोर, पुणे, हैदराबाद, अहमदाबाद इत्यादी अनेक ठरावीक ठिकाणी रोजगारासाठी युवा वर्ग जातांना दिसतो. परंतु देशातील अनेक राज्यात स्थानिक पातळीवर पाहिजे त्याप्रमाणात रोजगार सरकार उपलब्ध करून देवू शकली नाही ही देशाची शोकांतिका आहे. त्यामुळे काही युवावर्ग पुणे, मुंबई, हैदराबाद, बंगलोर, अहमदाबाद अशा नामांकित ठीकाणी धाव घेतांना दिसतात. अशा ठिकाणी त्यांना रोजगार मिळाला तर ठीक आहे अन्यथा हताश होऊन आत्महत्या होतांना सुध्दा आपण पहिले आहे.अशा परिस्थितीत देशाचे उच्च पदस्थ अधिकारी बेरोजगारांची तुलना कॉकरोचसोबत करीत असेल तर हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी १५ मे २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात एका खटल्याची सुनावणी करताना बेरोजगार तरुणांची तुलना झुरळांशी (कॉक्रोच) केली होती. वरिष्ठ वकील दर्जा मिळवण्याच्या याचिकेवर सुनावणी सुरू असताना, काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंव्वा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थेवर हल्ला करू लागतात, असे ते म्हणाले होते. या वक्तव्यामुळेच देशभरात मोठे वादळ निर्माण झाले. यावर प्रतिक्रिया उमटत असताना, सरन्यायाधीशांनी नंतर स्पष्टीकरण दिले की, त्यांचे हे वक्तव्य भारतातील सर्वसामान्य तरुणांविषयी नसून, बनावट पदव्या असलेल्या आणि समाजमाध्यमांवरून विनाकारण यंत्रणेला लक्ष्य करणाऱ्या विशिष्ट घटकाबाबत होते. ही बाब ठीक आहे व सत्य राहु शकते. परंतु कॉकरोच या शब्दरचनेमुळे युवकांमध्ये एक जागृता निर्माण झाली आहे आणि कॉकरोचचा झुंड (युवावर्ग) एकत्र झाला तर सरकारची मनमानी आणि भ्रष्टाचार बंद झाल्याशिवाय रहाणार नाही. आज देशाच्या प्रत्येक बेरोजगार तरूणांच्या मनात राजकीय पुढाऱ्यांन विषयीं व्देशभावना दिसून येते कारण आजी-माजी लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी यांचे वेतन, भत्ते, पेंशन, गाडी, बंगला, मोठ्या प्रमाणात करोडों रूपयांची चलअचल संपत्ती ही बाब नेहमी काळजात खुपत असते. कारण हे लोकप्रतिनिधी पाच वर्षांत करोडपती होतात. लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी हा देशाची जनतेची सेवा करण्यासाठी निवडून दिलेला प्रतिनिधि असतो. परंतु देशसेवा व जनसेवेला पाठ दाखवून स्वतःच्या सेवेत जास्त मग्न असतो आणि तेथुनच भ्रष्टाचाराचा उगम होतो. आज याच राजकीय पुढाऱ्यांमुळे देशाच्या सरकारी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. कारण याच राजकीय पुढाऱ्यांनी आपली मोठमोठी शाळा-महाविद्यालये खोलुन व्यवसाय थाटला आहे आणि आपल्या मुलांना शिक्षणासाठी विदेशात पाठवितात.यावरून स्पष्ट होते की, देशाच्या राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी देशाच्या शिक्षण व्यवस्थेला पोखरून टाकले आहे. त्यामुळे खरोखरच देशाला कॉकरोचची गरज आहे असे मला वाटते. कदाचित सरन्यायाधीशांना वाटले असावे की, युवा क्रांती व्हावी आणि तोच शब्द त्यांच्या तोंडून निघावा ही एक बेरोजगार तरूणांनसाठी टर्निंग पॉईंट असु शकतो आणि आता खरोखरच देशातील युवा बेरोजगार वर्ग एकत्र येण्याची खरी वेळ आली आहे. अमेरिका-इजरायल-इराण युध्दाला सुरुवात २८ फेब्रुवारी २०२६ ला सुरूवात झाली आणि या काळात देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका सुध्दा झाल्यात,मंत्री, प्रधानमंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते इत्यादी संपुर्ण राजकीय फौजफाटा पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीमध्ये दोन महिने प्रचारात व्यस्त होता. या काळात करोडो लिटर पेट्रोल-डिझेलचा वापर झाला आणि मोठ्या देशाचा पैसा खर्च झाला तेव्हा पेट्रोल-डिझेल भाव एक पैसाही वाढला नाही व अर्थव्यवस्थेवर काहीच झळ पोहोचली नाही आणि आता युद्ध थांबता बरोबर व विधानसभा निवडणुका संपल्या बरोबर पेट्रोल-डिझेलचे भाव दहा दिवसांत चार वेळा वाढविण्यात आले हि गंभीर बाब आहे. कारण पेट्रोल-डिझेलमुळे सरकारला ७७ हजार कोटींचा नफा असुनही पेट्रोल-डिझेलचे चौथ्यांदा भाव वाढने ही देशासाठी धोक्याची घंटा आहे आणि सरकार सांगते की, देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आपण हे भाववाढ करीत असल्याचे सरकार मार्फत सांगितले जात आहे.सरकार भाव वाढीचे कारण आंतरराष्ट्रीय आयात-निर्यातचे कारण सांगत आहेत. ही तर देशाची व देशाच्या युवावर्गाची फसवेगिरीच म्हणावी लागेल. सरकार खोटी आश्वासने देऊन बेरोजगार तरूणांनच्या जखमेवर मीठ चोळन्याचे काम करीत आहेत. त्यामुळे कॉकरोच आता सरकारला सुखाची झोप कदापि घेऊ देणार नाही. कारण आज कॉकरोच सोबत, शेतकरी वर्ग, देशातील सर्वसामान्य वर्ग, कामगार वर्ग, मजुर वर्ग एकत्र येत आहे. त्यामुळे आता सरकारला युवा बेरोजगारांना न्याय द्यावाच लागेल अन्यथा कॉकरोच (झुरळ) त्यांचे सर्वांचे गड उध्दवस्त करतील. कॉकरोच या विधानानंतर सोशल मीडियावर 'कॉक्रोच जनता पार्टी' नावाची एक ऑनलाइन चळवळही सुरू झाली आहे आणि याला करोडो फालोअर आपली पसंती दाखवीत आहे. कारण सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणतात की,काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे (कॉकरोच सारखे) असतात. हे सरन्यायाधीशांचे वक्तव्य देशाच्या बेरोजगार तरूणांच्या जिव्हारी लागले आहेत. त्यामुळे बेरोजगारांमध्ये मोठ्या प्रमाणात आक्रोश वाढला असून युवा क्रांती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. आपल्या देशात राजकीय वर्तुळात प्रथा आहे की, पहीले काहीही बोलून देणे आणि नंतर माफी मागणे किंव्वा माझा तो उद्देश नव्हता असे बोलून पळवाटा काढणे तेच काम माननीय सरन्यायाधीशांनी केल्याचे दिसून येते.असो जे होते ते चांगल्यासाठीच होते आणि हा तरूणांनसाठी एक चांगला टर्निंग पॉईंट राहावा असे मला वाटते.जय हिंद.

**रमेश लांजेवार**
नागपूर.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या एआरटी केंद्राच्या उल्लेखनीय कामगिरीस राज्यस्तरीय गौरव




नांदेड/प्रतिनिधी- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथील एआरटी केंद्राने एचआयव्ही/एड्स सेवा वितरण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आंध्रप्रदेश येथे आयोजित केंद्रीय आढावा बैठकीमध्ये या मानांकन अंतर्गत महाराष्ट्र राज्यास प्रथम श्रेणीचा सन्मान प्राप्त झाला असून, या यशामध्ये नांदेड जिल्ह्यातील एआरटी विभागाच्या कार्याची विशेष दखल घेण्यात आली आहे.

या उत्कृष्ट कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथील एआरटी केंद्राला अधिकृत प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. या प्रशस्तीपत्रात केंद्राच्या उल्लेखनीय कार्याबरोबरच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सामूहिक योगदानाचे कौतुक करण्यात आले आहे. ही यशस्वी कामगिरी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठबळ, दूरदृष्टी आणि प्रभावी नेतृत्वामुळे शक्य झाली आहे. विभागप्रमुख डॉ. शीतल राठोड व वैद्यकीय अधीक्षक डॉ. कापसे यांच्या प्रशासकीय सहकार्याखाली तसेच नोडल अधिकारी डॉ. मोहम्मद उबैदुल्ला खान यांच्या नेतृत्व, नियोजन व समन्वयातून एआरटी केंद्राने उत्कृष्ट सेवा मानके निर्माण केली आहेत. या यशामध्ये एसएमओ डॉ. प्रदीप जाधव आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे योगदान विशेष उल्लेखनीय ठरले आहे. रुग्णसेवेप्रती असलेली बांधिलकी, संघभावना आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा मानाचा गौरव प्राप्त झाला आहे. या अभिमानास्पद यशाबद्दल अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, विभागप्रमुख डॉ. शीतल राठोड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कापसे, नोडल अधिकारी डॉ. मोहम्मद उबैदुल्ला खान, एसएमओ डॉ. प्रदीप जाधव तसेच संपूर्ण एआरटी टीमचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून भविष्यातही उत्कृष्ट सेवा देत नवे मानदंड प्रस्थापित करण्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत.

# नांदेड तालुक्यात कृषी निविष्ठा विक्रेत्यांची खरीप पूर्वतयारी आढावा बैठक संपन्न




नांदेड/प्रतिनिधी-नांदेड तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांची खरीप हंगाम पूर्वतयारी आढावा बैठक आज जिल्हा असोसिएशन हॉल, नवीन मोढा, नांदेड येथे संपन्न झाली. कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम २०२६ संदर्भात मार्गदर्शन व आवश्यक सूचना देण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून कृषी निविष्ठा विक्रेत्यांना मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल यांनी सोयाबीन बियाण्यांच्या उगवण तक्रारी टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी जागतिक आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर युरिया व डीएपी खतांचा संभाव्य तुटवडा लक्षात घेऊन आवश्यक नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. तसेच अल-निनोच्या पार्श्वभूमीवर उद्भवू शकणाऱ्या कृषी आपत्कालीन परिस्थितीबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीस कृषी विकास अधिकारी निलकुमार ऐतवडे, जिल्हा परिषद मोहीम अधिकारी सचिन कपाळे, जिगुनिनी अमोल पेकम, कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) सौ. पूनम चातमल, कृषी अधिकारी (पंचायत समिती, नांदेड) सौ. छाया देशमुख, माफदाचे महासचिव विपीन कासलीवाल तसेच माजी जिल्हाध्यक्ष ओंकार रहाटे उपस्थित होते. कृषी निविष्ठा संघटनेच्या वतीने विक्रेत्यांच्या विविध समस्यांवर तोडगा काढण्याची मागणी यावेळी करण्यात आली. कार्यक्रमाची प्रस्तावना तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल यांनी केली. बैठकीस कृषी निविष्ठा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सदाशिव पुंड, नांदेड तालुका अध्यक्ष श्रीधरराव नागापूरकर, सचिव श्रीकांत वैद्य यांची विशेष उपस्थिती होती. या बैठकीस नांदेड तालुक्यातील कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी, कृषी निविष्ठा विक्रेते तसेच अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# स्वारातीम विद्यापीठाच्या संलग्नित २९ महाविद्यालयांमधील पदव्युत्तर प्रवेशांना स्थगिती!

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कडक पाऊल उचलले आहे. विद्यापीठांतर्गत येणाऱ्या ज्या पदव्युत्तर पारंपारिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण ऑनलाईन तपासणीमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण म्हणजेच 'एफ' ग्रेड मिळालेली आहे, अशा तब्बल २९ महाविद्यालयांमधील प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचे आदेश विद्यापीठाने जारी केले असल्याचे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने २७ मे, २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट इशारा दिला आहे की, त्रुटी आढळलेल्या व प्रतिबंधित केलेल्या यादीतील महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पारंपारिक पदव्युत्तर अभ्यासक्रमास कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देऊ नये. जर एखाद्या महाविद्यालयाने या आदेशाचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांना प्रवेश दिला, तर विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या सर्व शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी ते महाविद्यालय प्रशासन जबाबदार असेल. हा निर्णय केवळ पारंपारिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनाच लागू राहील. फार्मसी, विधी, शिक्षणशास्त्र (बी.एड./एम.एड.), आणि शारीरिक शिक्षणशास्त्र यांसारख्या व्यावसायिक महाविद्यालयांना या निर्णय व कारवाईतून वगळण्यात आले आहे. विद्यापीठाने जाहीर केलेल्या 'एएए गुणसंख्या' च्या एकूण ७२ महाविद्यालयांच्या यादीमध्ये केवळ पाच महाविद्यालयांना 'ओ' ग्रेड आणि आकरा महाविद्यालयांना 'ए' ग्रेड मिळवता आला आहे. तर 'बी' ग्रेड १३ महाविद्यालये, 'सी' ग्रेड ४ महाविद्यालये, 'डी' ग्रेड ५ महाविद्यालये, 'ई' ग्रेड ५ महाविद्यालये आणि सर्वात जास्त म्हणजेच एकोणतीस महाविद्यालये 'एफ' ग्रेड श्रेणीत फेकली गेल्याने त्यांच्यावर ही नामुष्की ओढावली आहे. विद्यापीठाने प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचे (स्थगित करण्याचे) आदेशामध्ये नांदेड जिल्ह्यातील सर्वाधिक अठरा महाविद्यालये, लातूर जिल्ह्यातील सात आणि परभणी जिल्ह्यातील चार महाविद्यालयांचा समावेश आहे. यामध्ये 'एफ' ग्रेड प्राप्त अनेक नामांकित महाविद्यालयांचा समावेश आहे.

विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्या परिषद व अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्या अध्यक्षतेखाली हा कडक निर्णय घेतला आला. अधिकृत यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ॲफिलेशन या शीर्षकाखाली उपलब्ध करण्यात आली असल्याचे शैक्षणिक (संलग्नीकरण) विभागाचे उपकुलसचिव यांनी कळविले आहे. वसंतराव नाईक महाविद्यालय (वसरणी, नांदेड), श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय (लोहा), पानसरे महाविद्यालय (अर्जापूर), शरदचंद्र आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (नायगाव), जवाहरलाल नेहरू कॉलेज ऑफ सोशल वर्क अँड रिसर्च सेंटर (सिडको, नांदेड), वै. धुंडा महाराज देगलूरकर कॉलेज (देगलूर), कै. भीमराव चव्हाण आर्ट्स अँड सायन्स कॉलेज (चव्हाणवाडी, बऱ्हाळी), श्री रेणुकादेवी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय (माहूर), राजीव गांधी कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड मॅनेजमेंट (नांदेड), राजीव गांधी महाविद्यालय (मुखेड), एमजीएम कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड मीडिया सायन्स (नांदेड), छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालय (किनवट), विश्वभारती महाविद्यालय (सिडको, नांदेड), विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट (नांदेड), छत्रपती संभाजी महाराज महाविद्यालय (माहूर), सिंधू कॉलेज ऑफ आयटी अँड सायन्स (देगलूर), इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी (विष्णुपुरी, नांदेड), श्री गुरु गोविंदसिंग कॉलेज (बी.जे.) (नांदेड). संत संभाजी शिंदे कॉलेज ऑफ लायब्ररी अँड इन्फो. सायन्स (परभणी), डीएसएम इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट (परभणी), यशवंत कॉलेज ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (परभणी), रविंद्रनाथ टागोर चित्रकला महाविद्यालय (परभणी). स्वामी विवेकानंद महाविद्यालय (शिरूर ताजबंद), श्री कुमारस्वामी महाविद्यालय (औसा), कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय (हाडोळी), सरस्वती संगीत कला महाविद्यालय (लातूर), श्यामगिरी महाविद्यालय, (दापका), मातृभूमी महाविद्यालय (उदगीर), ब्रिलियंट महाविद्यालय (रात्रीचे) (लातूर) या महाविद्यालयांचा समावेश आहे.

# देगलूर येथील वाहक एम.ऐ.नजीर यांचा अपघाती मृत्यू

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर आगारातील वाहक म्हणून कार्यरत असलेले एम. ऐ. नजीर यांचा बुधवारी दि. २७ मे रोजी तेलंगणा राज्यातील मेनूर येथे झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे देगलूर आगारासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



एम. ऐ. नजीर हे बुधवारी पहाटे ३ वाजता देगलूर ते नांदेड ही एसटी ड्युटी पूर्ण करून दुपारनंतर तेलंगणा राज्यातील मेनूर येथील सासुरवाडीकडे दुचाकीवरून जात होते. सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास नांदेड-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर मेनुर परिसरात त्यांच्या दुचाकीला एका भरधाव वाहनाने जोरदार धडक दिली. धडक दिल्यानंतर घटनेची माहिती मिळताच मदनूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मोहन रेड्डी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत नजीर यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. विशेष म्हणजे वडिलांच्या निधनानंतर त्यांना अनुकंपा तत्वावर एसटी महामंडळात नोकरी मिळाली होती. त्यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच देगलूर आगार व्यवस्थापक संजय आकुलवार हे सहकारी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले.

# नांदेड जिल्ह्यात खरीपासाठी मुबलक खत साठा उपलब्ध

नांदेड/प्रतिनिधी-खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांच्या दृष्टीने खत ही सर्वात महत्त्वाची निविष्ठा असते. राज्य पातळीवर खताचे नियोजन कृषी आयुक्तालय, पुणे येथून होत असते. कृषी आयुक्तालयाकडून खरीप हंगामाच्या सुरवातीलाच जिल्ह्यासाठीचे खताचे आवंटन कळवले जाते. नांदेड जिल्ह्याला खरीप हंगामासाठी दरवर्षी सरासरी २ लाख मेट्रिक टन खतांची आवश्यकता असते. खरीप हंगाम २०२६ साठी नांदेड जिल्ह्याला सुमारे २,११,५०० मे.टन इतके खत आवंटन प्राप्त झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने ६०,२०० मे. टन युरिया, ३२३०० मे. टन डीएपी व ८५३०० मे. टन संयुक्त खते यांचा समावेश आहे.

मागील वर्षीची शिल्लक व यावर्षी १ एप्रिल पासून आजतागायत झालेला पुरवठा याचा अभ्यास केल्यास बाजारात ३१,०९८ मे. टन युरिया होता. पैकी १ एप्रिलपासून आज अखेर १४,५९७ मे. टन युरिया ची विक्री झाली असून १६,५०२ मे. टन युरिया मार्केट मध्ये उपलब्ध आहे. १९,२७५ मे. टन डीएपी पैकी ७,६०० मे. टन विक्री झाली असून आज बाजारात ११,६७४ मे. टन डीएपी खत उपलब्ध आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे डीएपी सारखे खत आवश्यकतेपेक्षा थोडे कमी उपलब्ध असले तरीही २०:२०:०:१३, १२:३२:१६ यासारखे संयुक्त खतांचे पर्याय शेतकऱ्यांना वापरता येतील. सद्यस्थितीत ६७,००० मे. टन संयुक्त खता सहित एकूण १,२५,५०० मे. टन खते बाजारात उपलब्ध आहेत. टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास शेतकऱ्यांना सुलभ खत पुरवठा होण्याच्या दृष्टीने 'बफर स्टॉक' म्हणजेच संरक्षित खतसाठा निर्माण केलेला आहे. आज रोजी यामध्ये ४,०२८ मे. टन युरिया व १,४८५ मे. टन डीएपी खत उपलब्ध आहे. त्यामुळे कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, आपण कृषी विद्यापीठाच्या शिफारसीत खतमात्रानुसार, जमीन आरोग्य पत्रिका अहवालानुसार तसेच पीक वाढीच्या टप्प्यानुसार खत खरेदी करावे.शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये व खत तुटवड्याच्या भीतीपोटी अनावश्यक खत खरेदी करू नये. खते उपलब्ध होण्यात अडथळा निर्माण झाल्यास, वाजवीपेक्षा जास्त दरात खत विक्री होत असल्यास, खतामध्ये कोणत्याही प्रकारची लिंकिंग होत असल्यास अथवा बोगस खतांची विक्री होत असल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

# नागरिकांना घरपोच गॅस सिलेंडर पुरवठा करण्याची ठाकरे सेनेची मागणी

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर येथील बिरादर गॅस एजन्सीकडून मागील दोन ते तीन महिन्यांपासून गॅस सिलेंडरचा घरपोच पुरवठा बंद असल्याने ग्राहकांना भर उन्हात दिवसभर रांगेत उभे राहावे लागत आहे. यामुळे वृद्ध महिला व नागरिकांना मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत असून, गॅस सिलेंडर पूर्ववत घरपोच सेवा सुरू करण्याची मागणी शिवसेना (ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांनी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे केली आहे.

महेश पाटील यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देगलूर येथील एकमेव बिरादर गॅस एजन्सी दोन महिन्यांपासून गॅस सिलेंडर घरपोच सेवा देत नाही तसेच एजन्सीसमोरच सिलेंडरचे वाटप होत असल्याने तिथे मोठी गर्दी होत आहे. त्यामुळे ग्राहकांना कामधंदा सोडून भर उन्हात तासंतास रांगेत उभे राहावे लागत आहे. विशेष म्हणजे त्यामध्ये वृद्ध पुरुष व महिलांसह सर्वसामान्य नागरिकांचे यामुळे प्रचंड हाल होत आहेत. तरी शासनाच्या नियमानुसार गॅस सिलेंडर घरपोच देणे बंधनकारक असताना एजन्सी मालकाने नियम धाब्यावर बसवत गॅस सिलेंडरची घरपोच सेवा बंद ठेवून ग्राहकांचे हाल अपेष्टा, पिळवणूक सुरूच ठेवले आहे. त्यामुळे मा जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ गॅस एजन्सी धारकाला आदेश देऊन पूर्ववत सिलेंडर घरपोच सेवा सुरू करावी आणि ग्राहकांची होणारी गैरसोय दूर करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, पांडुरंग पाटील थडके देगावकर, भगवान जाधव, विनोद सोनकांबळे, संतोष कांबळे, सायलूसेठ हनमन्लू शहापूरकर आदींची उपस्थिती होती.




शिवसंवाद निमित्त नायगाव येथे आयोजित विधानसभा निहाय आढावा बैठकीला खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर, आ.हेमंत पाटील, आ.बालाजी कल्याणकर, आ.आनंदराव बोंढारकर, माजी आ.शंकरअण्णा धोंडगे, जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, उमेश मुंडे, ओमप्रकाश धुपेकर यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# माहूर शहरातील वाढते अतिक्रमण व अवैध पार्किंगमुळे अपघातांचा धोका वाढला

## जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे कार्यवाहीची मागणी

माहूर/प्रतिनिधी-शहरातील वाढते अतिक्रमण, हॉटेल व्यवसायिकांकडून रस्त्यावर होणारी अवैध पार्किंग आणि अर्धवट रस्त्याच्या कामांमुळे वाढणारे अपघात रोखण्यासाठी तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा नगरसेविका प्रतिनिधी आकाश रमेश कांबळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माहूर शहरातील पेट्रोल पंप ते देवी रोड तसेच टी-पॉईंट ते ग्रामीण रुग्णालय मार्ग या परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण वाढले आहे. अनेक हॉटेल व्यवसायिकांनी राष्ट्रीय राज्य महामार्गालगत अवैधरित्या टिनशेड उभारले असून स्वतःची पार्किंग व्यवस्था नसल्याने वाहनांची पार्किंग थेट रस्त्यावर केली जात आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे.दि. २६ मे रोजी मॉर्निंग वॉकसाठी गेलेले भारत बेहरे (वय ६०) यांना एका भरधाव कारने चिरडल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून यापूर्वीदेखील अशा प्रकारचे अपघात घडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वाढते अतिक्रमण, अवैध पार्किंग आणि अपूर्ण रस्ते कामांमुळे अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.निवेदनाद्वारे प्रशासनाकडे पेट्रोल पंप ते देवी रोड तसेच टी-पॉईंट ते ग्रामीण रुग्णालय मार्गावरील दोन्ही बाजूंचे अतिक्रमण तात्काळ हटविण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच हॉटेलसमोरील राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील अवैध टिनशेड काढणे, रस्त्यावर वाहन पार्किंग करणाऱ्या हॉटेल मालकांवर कारवाई करणे, अर्धवट रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करणे आणि भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली आहे.या निवेदनाच्या प्रती कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग (राष्ट्रीय महामार्ग), सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय महसूल अधिकारी किनवट, तहसीलदार माहूर, मुख्याधिकारी नगर पंचायत माहूर तसेच पोलीस निरीक्षक माहूर यांनाही देण्यात आल्या आहेत.

# विशाल भंडारी एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील सराईत गुन्हेगार विशाल राजू कानोजी उर्फ भंडारी यास पोलीसांनी एमपीडीए अंतर्गत एका वर्षासाठी स्थानबद्ध केले असून त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात करण्यात आली आहे.

विशाल राजू कानोजी उर्फ भंडारी (वय २८) रा.परिमलनगर,नांदेड याच्या विरुध्द खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत करणे, शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, अवैधरित्या शस्त्र बाळगणे व इतर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. पोलीसांनी त्याच्यावर अनेकवेळा प्रतिबंधात्मक कार्यवाही करुनही भंडारी याच्या वर्तुवणुकीत सुधारणा झाली नाही. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वेंजने यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक संतोष तांबे यांनी विशाल भंडारी याच्या विरुध्द एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्याकडे पाठविला होता. पोलीस अधीक्षकांनी सदर कारवाईवर शिक्कामोर्तब करुन मंजुरीसाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे पाठविण्यात आला होता. राहुल कर्डिले यांनी सदरील प्रस्तावाला मंजुरी दिली असून विशाल भंडारी यास एमपीडी अंतर्गत एका वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले. त्याची रवानगी पोलीसांनी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात करण्यात आली आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **HURUNNISA SAHEEN ABDUL SAMAD** which now I am, changing as (new name) **HOORUNNISA BEGUM**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**HOORUNNISA BEGUM**
R/o Roshan manzil Peer nagar
masjid-e-mohammadia Nanded-431605
M.No.-9422185714

CHANGE IN NAME

My (old name) is **HURUNNISA BEGUM SHAMSHUDDIN** which now I am, changing as (new name) **HOORUNNISA BEGUM**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**HOORUNNISA BEGUM**
R/o H.no.1-13-888, near mohamaddiya
masjid, Peer nagar Nanded-431605
M.No.-9422185714

# विठ्ठल असोरे यांचा कास्ट्राईब संघटनेकडून सत्कार

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त लेखा अधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल रामजी असोरे यांना अहमदपूर येथील अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्स यांच्या वतीने छत्रपती शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल आज कास्ट्राईब संघटना जिल्हा परिषद नांदेड यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष श्याम कावळे, विस्तार अधिकारी विठ्ठल कांबळे, आर. पी. केंद्रे, कक्ष अधिकारी विजय वाघमारे, गोविंद गड्डूवार, अमोल पाटील, मिलिंद व्यवहारे आदी उपस्थित होते. यावेळी विठ्ठल असोरे यांचा नांदेड येथे शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

# अवकाळी धारांसोबत बरसल्या गारा!

माहूर/प्रतिनिधी-माहूर शहरात दि. २७ रोजी दुपारी सुमारे ४ वाजेच्या दरम्यान अचानक अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. जवळपास अर्धा तास सुरू असलेल्या या बेमोसमी पावसामुळे शहरातील जनजीवन काही काळ विस्कळीत झाले.

पावसासोबत हलक्या गारांचाही वर्षाव झाल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला. अचानक आलेल्या या पावसामुळे काही वेळ शहरातील वीजपुरवठाही खंडित झाला होता. उन्हाच्या तीव्र झळांनी हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला. अचानक काळे ढग दाटून येत जोरदार पाऊस आणि गारांचा वर्षाव झाल्याने अवकाळी धारा... सोबत बरसल्या गारा! असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली.

# किनवट तहसील प्रशासन अडचणीत;गौण खनिज प्रकरण थेट महसूल मंत्र्यांपर्यंत

## मुरुम-रेती प्रकरण तापले,तहसीलदारांच्या चौकशीची मागणी जोरात

किनवट/प्रतिनिधी-किनवटच्या तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्या प्रशासनाविरुद्ध जनाक्रोशातून लाचखोरीच्या तक्रारीत वाढ झाली असून त्यांच्यामागे चौकशी व सुनावण्यांचे शुक्लकाष्ठ लागल्याचे दिसते. निसपूर येथील माणिक गणपत मुंडे या शेतकऱ्याने घराच्या भरावासाठी रॉयल्टीचा मुरुम घेऊन जात असतांना पकडलेल्या हायवागाडीचे प्रकरण आता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंपर्यंत पोहोचले असून उपविभागीय अधिकाऱ्यांच्या स्तरावर परवाच पहिली सुनावणी होऊन २९ मे रोजी दुसऱ्या सुनावणी होणार असल्याचे सुत्रांकडून समजते. रेती-मुरुम, गौण खनिजांच्या बहूचर्चीत अवैध धंद्याप्रकरणी सुनावण्यावर सुनावण्या घेऊन चालणार नाही तर, तहसीलदारांची खातेनिहाय (डी.ई.) चौकशी करून कारवाई करण्याची मागणी मुंडे यांनी केली आहे.

राजगड शिवारातील शेत सर्वे नंबर ७२ मधील भोगवटदार क्र.दोन गायरान जमिनीवर अवैध खदान करून हजारो ट्रॅक्टर मुरुम चोरीला गेला असल्याच्या तक्रारी आहेत. त्याकडे मात्र तहसीलदारांसह संबंधितांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे सांगण्यात आले. शेतातून अधिकृत परवाना प्राप्त खदान असून त्यातील मुरुम घराच्या भरावासाठी घेऊन जात असतांना वस्तुनिष्ठ पुरावे दाखवल्यानंतरही हायवागाडी सोडली नसल्यामुळे त्या शेतकऱ्याने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंकडे धाव घेतलीय. अवैध गौण खनिजाच्या पकडलेल्या गाड्या तहसील कार्यालयातून रात्री कशा पळविल्या जातात या पुराव्यासह तहसीलदारांची तक्रार करुन चौकशीची मागणी केली आहे. २३ मे रोजी पाहिली सुनावणी झाल्याचे समजते. आता दुसरी सुनावणी २९ मे रोजी होणार असल्याचे सुत्रांनी सांगितले. प्रकरण आहे गौण खनिजाची चोरी करून विना ई-टीपी वाहतूक करणारे ट्रॅक्टरं महसूलच्या पथकाने मरमर करून पकडून तहसील कार्यालयाच्या प्रांगणात लावले. परंतु दंडाच्या रक्कमेचा भरणा चुकवत रात्रीची फिल्डींग लाऊन जप्त केलेले ट्रॅक्टरं पळवून नेल्याचा मुद्दा व्हायरल व्हिडिओच्या माध्यमातून ऐरणीवर आणला आहे. माणिक गणपतराव मुंडे यांच्याकडे रॉयल्टीचा परवाना असतांनाही त्यांची हायवागाडी तहसील कार्यालयात आणून लावले. मुंडेनी तहसीलदारांना पूर्ण मुद्यावर चर्चा केली मात्र तहसीलदार मुळीच बाजू समजून घेत नव्हते. म्हणून मंत्री बावनकुळे यांच्यापर्यंत प्रकरण पोहोचले. शे.स.नं.७२ चे प्रकरण अवैध धंद्याचा जीताजागता पुरावा म्हणून मुंडेंनी उपस्थित केलाय. शे.स.नं.७२ हा भोगवटदार दोन असून दोन शेतकरी आणि राखीव वन असा विभागला आहे. आता त्यात नेमके अवैध उत्खनन कुठे झाले? किती झाले? हा चौकशीचा विषय असल्याचे सांगितले. मंत्री झिरवळांचा दौरा असेल, इस्लापूरातील नियोजित पेट्रोल पंपाच्या जमिनीविषयीचा लाचेचा मुद्दा असेल, आमदार भीमराव केरामांनी मंत्री बावनकुळेंकडे उद्देशून केलेली तक्रार आणि आता गाजत असलेल्या मुंडेंचे प्रकरण. तालुक्यातील गौण खनिजाची एकदा खातेनिहाय चौकशी झालीच पाहिजे या मुद्यावर प्रकरण पोहोचले आहे. उपविभागीय अधिकाऱ्यांच्या चौकशीवर अद्यापपर्यंत ठोस कारवाई झालेली नसल्यामुळे उलटसुलट प्रतिक्रिया ऐकायला मिळताहेत.

## लोहा येथे मटका अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-लोहा शहरातील मोंढा रोडवर सुरु असलेल्या मटका अड्डयावर पोलीसांनी बुधवारी सायंकाळी धाड टाकुन दोन जणांना अटक केली.

मोंढा रोडवरील एका शेडमध्ये मटका अड्डा सुरु होता. बुधवारी सायंकाळी पोलीसांच्या एका पथकाने मटका अड्डयावर धाड टाकुन मटका घेणाऱ्या दत्तात्रय विठ्ठलराव बनसोडे, गणेश पांडुरंग चव्हाण रा.लोहा या दोघांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून मटका घेण्याचे साहित्य व रोख रक्कम पोलीसांनी जप्त केली. याप्रकरणी लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




शांतीदुत प्रतिष्ठाणच्यावतीने दाभड येथे आयोजित सामुहिक मंगल परिणय सोहळ्यात अकरा जोडपे विवाहबद्ध झाले आहेत. यावेळी भन्ते अतुरलीय रतन महाथेरो, भन्ते रेवत बोधी, महाउपासक डॉ.एस.पी.गायकवाड, सा.ना.भालेराव, जी.बी.सोनकांबळे, गणपत गायकवाड, डॉ.विजयकुमार माहुरे, डी.पी.गायकवाड, प्रेमदास घुले, सुभाष काटकांबळे, एस.टी.पंडित यांच्यासह इतर मान्यंवर व बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावरकरांवरुन महाराष्ट्रात तेढ पसरवण्याचा प्रयत्न

## राज ठाकरेंच्या सत्ताधाऱ्यांना कानपिचक्या

मुंबई/प्रतिनिधी-सावरकरांचे नाव घेऊन राजकीय फायद्यासाठी त्यांचा वापर करणाऱ्यांनी खरोखरच सावरकर वाचले आहेत का, असा सवाल करीत स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी फेसबुक पोस्टद्वारे सध्याच्या राजकारणावर आणि समाजातील बदलत्या प्रवृत्तींवर टीका केली.

राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, सावरकर हे केवळ हिंदू राष्ट्रवाद मांडणारे तत्वज्ञ नव्हते, तर ते विज्ञाननिष्ठ, तर्कवादी आणि समाजसुधारक होते. धर्मातील त्रुटींवर त्यांनी वेळोवेळी प्रखरपणे टीका केली. जातीअंतासाठी त्यांनी संघर्ष केला. मात्र आज त्यांच्या नावाचा वापर करून समाजात धार्मिक आणि जातीय तेढ निर्माण करण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला.सावरकरांना कुठल्याही व्यक्तीचा अंधउदोउदो मान्य नव्हता. प्रत्येक गोष्ट तर्क आणि विज्ञानाच्या कसोटीवर तपासून पाहण्याचा त्यांचा आग्रह होता. पण आज महाराष्ट्रात व्हॉट्सॲप विद्यापीठातून आलेल्या माहितीवर कोणताही विचार न करता विश्वास ठेवण्याची स्पर्धा लागली आहे, असे राज ठाकरे यांनी नमूद केले.राजकीय नेते आणि समाजातील काही घटक भोंदू बाबांच्या मागे लागल्याचेही त्यांनी म्हटले. महाराष्ट्राची पुरोगामी आणि विचारसंपन्न परंपरा विसरून समाजाला उत्सव, डीजे आणि दिखाऊपणात अडकवले जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.सावरकर हे प्रखर हिंदू धर्माभिमानी होते, पण त्यांनी धर्मातील चुकीच्या प्रथांवर टीका करण्यास कधीही मागेपुढे पाहिले नाही. आज मात्र त्यांच्या प्रतिमा वापरून धर्मांमध्ये तेढ निर्माण केली जात आहे. जातीअंतासाठी लढणाऱ्या सावरकरांच्या महाराष्ट्रात जातीवरून संघर्ष उभे केले जात आहेत आणि याला सत्ताधारी खतपाणी घालत आहेत, असा आरोपही त्यांनी केला.सावरकरांचा तिरस्कार करणाऱ्यांपेक्षा त्यांच्या नावाचा वापर स्वतःच्या राजकारणासाठी करणारे अधिक धोकादायक असल्याचे सांगत, त्यांना नक्की कुठले सावरकर समजले आहेत? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

# निवडणुकीत विकलेली शेती

## खा.श्रीकांत शिंदे यांनी मिळवून दिली परत

भोकर/प्रतिनिधी-पक्ष वाढविण्यासाठी स्थानिक पातळीवर कार्यकर्ते जीव ओतून काम करतात अशा कार्यकर्त्यामुळेच पक्षाला बळ मिळते पक्ष मोठा होतो. भोकर मध्ये नगरपरिषद निवडणुकीत पराभूत झालेल्या शिवसैनिकाला खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांनी सामाजिक जाणिवेतून अशीच मदत करुन निवडनुकीसाठी विकलेली शेती परत मिळवून दिली.

भोकर येथील शिवसेना तालुकाप्रमुख (शिंदे गट) माधव पा.वडगावकर हे भोकर येथील नगरपरिषद निवडणुकीत उभे होते समोरच्या प्रबळ उमेदवारासमोर खर्च करताना त्यांना आर्थिक अडचणी आल्या त्यातच त्यांना स्वतःची शेती ही विकावी लागली, मात्र अल्पशा मतांनी त्यांचा पराभव झाला. ही बाब शिवसेनेच्या आढावा बैठकीमध्ये कार्यकर्त्यांनी खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावेळेस त्यांनी वडगावकर यांना जवळ बोलावून मदत करण्याचे आश्वासन दिले आणि आठ दिवसानंतर ज्यांनी ती शेती घेतली होती त्यांना संपर्क करून विकलेल्या शेतीची किंमत देऊन ती शेती परत मिळवून दिली. या कामामुळे शिवसैनिकांमध्ये बळ निर्माण झाले. एवढ्या मोठ्या उंचीचा नेता कार्यकर्त्याची जाणीव ठेवणारा नेता आपण ३२ वर्षाच्या काळात प्रथमच बघितला असे मत तालुका प्रमुख माधव पा. वडगावकर यांनी व्यक्त केले असून उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे खा. श्रीकांत शिंदे, ना. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर आ. बाबुराव कोहळीकर, जिल्हाप्रमुख विनय गीरडे आदींचे आभार व्यक्त केले आहेत.

# कत्तलीसाठी बांधुन ठेवलेल्या तेरा गोवंशाची पोलीसांनी केली सुटका

नांदेड/प्रतिनिधी-कत्तलीसाठी एका टिनशेडमध्ये बांधुन ठेवलेल्या तेरा गोवंशाची हिमायतनगर पोलीसांनी बुधवारी सुटका केली आहे. या प्रकरणी एका जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, पोलीस उपअधीक्षक डी.एस.हाके यांच्या मार्गदर्शनाखाली हिमायतनगर पोलीस स्टेशनचे पो.नि.अमोल भगत व त्यांचे सहकारी बुधवारी गस्त घालीत असतांना हिमायतनगर शहरातील मृर्तुजा कॉलनी भागात कत्तलीसाठी गोवंश जातीचे जनावरे बांधुन ठेवल्याची माहिती मिळाली. पोलीस निरिक्षक अमोल भगत व पोलीस कर्मचाऱ्यांनी बुधवारी सायंकाळी मृर्तुजा कॉलनी भागातील शेख जलील शेख खाजामियाँ रा.रहिम कॉलणी, हिमायतनगर यांच्या टिनशेडवर छापा टाकला. त्याठिकाणी गोवंश जातीचे तेरा जनावरे बांधुन ठेवलेले पोलीसांना आढळून आली.




पोलीसांनी सदरील जनावरांची सुटका केली. याप्रकरणी पोलीस शिपाई चंद्रकांत आरकिलवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शेख जलील शेख खाजामियाँ याच्या विरुध्द विविध कलमान्वये हिमायतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# इकडे ऐकले नाही तर तिकडे बघुन घेवू

## निधी वाटपावरुन उदय सामंतांचा मंत्री गोरेंसह भाजपला इशारा

सोलापूर: सोलापूरमध्ये निधी दिला नाही तर आम्ही रत्नागिरी जिल्ह्यात समन्वय साधणार नाही, अशा शब्दात राज्याचे उद्योगमंत्री तथा शिवसेना नेते उदय सामंत यांनी सोलापूरचे पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांच्यासह भाजपला इशारा दिला आहे. यावरुन महायुतीमधील घटक पक्षांमध्ये अंतर्गत धुसफूस मोठ्या प्रमाणात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात केली जात आहे.


भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार) हे तीन पक्ष राज्यात सत्तेवर आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यात निधी वाटपा संदर्भात भाजपच्या पालकमंत्र्यांकडून समन्वय साधला जात नाही. अशा तक्रारी शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत व्यक्त केल्या गेल्या. काल बुधवारी सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी (ता.माढा) येथे शिंदेसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक झाली. यावेळी सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे भाजपवगळता जिल्ह्यातील इतर युतीच्या पक्षातील कार्यकर्त्यांना वेगळी वागणूक देत असल्याच्या तक्रारी भरसभेत करण्यात आल्या. भाजप युतीतील कार्यकर्त्यांना प्रचंड त्रास देत आहे. सत्ता असूनही एक रूपयाचे काम होत नाही. निधी मंजूर होत नाही, अशी तक्रार संजय कोकाटे यांनी केली होती. यावर मंत्री सामंतांनी भाजपसह पालकमंत्री गोरेंना थेट इशाराच देऊन टाकला आहे.उदय सामंत म्हणाले, आम्ही पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी बोलणार आहोत. त्यांनी नाही ऐकले तर रत्नागिरीत जशास तसे वागू. भाजपची विधान परिषद यादी ही दिल्लीतून प्रसिद्ध होणार आहे. पण, आम्ची विधान परिषदेची यादी ही मुंबईतून प्रसिद्ध होईल. स्वत: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे यादी प्रसिद्ध करतील.पदाधिकारी आढावा बैठकीत मंत्री उदय सामंत यांनी कार्यकर्त्यांची शाळा घेऊन कान पिचक्या दिल्या.

# 'मुसलमानों का सियासी अजेंडा' पुस्तकावर नांदेडमध्ये ५ जून रोजी परिसंवाद

नांदेड/प्रतिनिधी-फारुक अहमद लिखित मुसलमानों का सियासी अजेंडा या पुस्तकावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. ५ जून २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता पुरणमल लाहोटी सभागृह, सायन्स कॉलेज, नांदेड येथे होणार आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक मा. बालाजी थोटवे राहणार आहेत. प्रमुख भाषक म्हणून ज्येष्ठ साम्यवादी नेत्या कॉ. स्मिता गोविंद पानसरे तसेच ज्येष्ठ पत्रकार व दै.नांदेड तहेरीकचे संपादक मा.अल्ताफ सानी हे या पुस्तकावर भाष्य करणार आहेत. तर यावेळी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव अँड.कॉ.प्रदीप नागापुरकर, मराठवाडा साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष बालाजी ईबितदार,




अल रिजवान एज्यु.सोसायटीचे अध्यक्ष अब्दुल वहीद, मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष उद्धव सूर्यवंशी, शिक्षण पतसंस्थेचे संचालक बालासाहेब लोणे आणि एमपीजेचे प्रदेश उपाध्यक्ष अल्ताफ हुसेन यांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी प्रज्ञाधर ढवळे हे लेखक फारुक अहमद यांची प्रकट मुलाखत घेणार आहेत. भारतीय पिछडा शोषित संघटना, सप्तरंगी साहित्य मंडळ, बीसेफ व लसाकम-नांदेड यांच्या वतीने या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

CHANGE IN NAME/SURNAME

My (old name) is **PATIL MAYURI** which now I am, changing as (new name) **MAYURI SUYOG BHUTAWALE**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MAYURI SUYOG BHUTAWALE**
R/o Opp Sarthak lodge plot no.08
Nana Mastar nagar Mudre khurd
Karjat, Raigad - 410201
M.No.-8407995400

पान १ वरुन

## किनवट येथे जनविरोधी...

सुनील राठोड, बाणा कोतुरवार, नामदेव चव्हाण, श्यामराव धुपे, महेमूद पठाण, सिनू आडे, अर्चना काळे, रंगराव चव्हाण, यशवंत राठोड, धनलाल नाईक, समता पार्टीचे विनोद कदम यांच्यासह किसान सभा, डीवायएफआय आणि सिटू संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.सरकारने इंधन दरवाढ, नीट घोटाळा, पीकविमा व खत-बी-बियाणे दरवाढीच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय न घेतल्यास आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही संघटनांच्या वतीने देण्यात आला.

पान १ वरुन

## नीट परीक्षा लष्कराच्या...

आहे. तसेच पुण्यातील एपीएमए कोचिंग इन्स्टिट्यूटशी संबंधित भौतिकशास्त्राचे शिक्षक तेजस हर्षदकुमार शाह यालाही तपास यंत्रणांनी ताब्यात घेतले आहे. तपासादरम्यान तेजस शाह याच्या मोबाईलमध्ये संबंधित व्यक्तीचा नंबर गॉड या नावाने सेव्ह असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.सीबीआयच्या तपासात रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि भौतिकशास्त्र या तिन्ही विषयांच्या प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वीच फुटल्याचे उघड झाले आहे. या आंतरराज्यीय रॅकेटचा पर्दाफाश करण्यासाठी सीबीआयने आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगरसह देशभरातील तब्बल ४९ ठिकाणी छापेमारी केली आहे. या परीक्षेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यामुळेच आता केंद्र सरकार परीक्षाव्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याच्या तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत.

## खा.श्रीकांत शिंदे व...

लोकसभेत एकत्र काम केले. नांदेड दौऱ्यावर आले असतांना आपल्या घरी येण्याचे निमंत्रण त्यांना दिले होते. परंतु वेळेअभावी खा.शिंदे हे येवू न शकल्याने मीच त्यांना भेटायला हॉटेलमध्ये गेलो होतो असे आ.चिखलीकर यांनी सांगितले. नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी आ. चिखलीकर यांचे पुत्र प्रविण पाटील चिखलीकर हे इच्छुक असल्याने दोन्ही नेत्यांच्या भेटीची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरु आहे.

## पेट्रोल-डिझेलवरील कर...

तातडीने निर्णय घ्यावा, असे आवाहन केले आहे. या प्रसिद्धी पत्रकावर भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कौन्सील सदस्य अॅड.कॉ.प्रदीप नागापूरकर, जिल्हासचिव कॉ.शिवाजी फुलवळे, सहसचिव कॉ.देवराव नारे, शहरसचिव कॉ.वैशाली धुळे, कॉ.प्रकाश बैलकवाड, कॉ.गणेश संदुपटला, कॉ.भगवान नाईक आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४